निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : ७८ वा
शुक्रवार -२३ मे २०२५

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

# देशातील १०३ राज्यातील १५ रेल्वे स्थानकांचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण

**मुंबई**/ अमृत भारत स्थानक योजनेतून मुंबई शहराचे वैभव आणि युनेस्को जागतिक वारसास्थळ असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस इमारतीचा पुनर्विकास करण्यात येणार असून यासाठी दोन हजार आठशे कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

अमृत भारत रेल्वे स्टेशन योजनेतून पुनर्विकसित करण्यात आलेल्या देशातील १०३ रेल्वे स्थानकांचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज लोकार्पण झाले. बिकानेर येथे आयोजित या कार्यक्रमामध्ये राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन आणि मुख्यमंत्री श्री.फडणवीस परळ रेल्वे स्थानक येथून दूरदृष्य प्रणालीद्वारे सहभागी झाले. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी माध्यमांशी कार्यक्रमानंतर संवाद साधला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, वंदे भारत रेल्वे, नमो भारत रेल्वे, अमृत भारत रेल्वे अशा रेल्वेच्या माध्यमातून भारतीय रेल्वेचा कायापालट होत आहे. जर्मनीच्या रेल्वे जाळ्यापेक्षा जास्त लांबीचे रेल्वेचे जाळे प्रधानमंत्री मोदी यांच्या मार्गदर्शनात मागील ११ वर्षात उभारले आहे. विमानतळांच्या धर्तीवर सर्व रेल्वे स्थानकांचा विकास करण्यात येत आहे. विमानतळ परिसरात उपलब्ध असलेल्या अत्याधुनिक सोयी सुविधा या अमृत भारत रेल्वे स्टेशनच्या माध्यमातून आता सर्वसामान्य नागरिकांसाठीही उपलब्ध असणार आहेत. मुंबईतील परळ, चिंचपोकळी, माटुंगा आणि वडाळारोड या उपनगरीय स्थानकांसह राज्यातील १५ स्थानकांचा पुनर्विकास पूर्ण झाला असून त्याचे लोकार्पण करण्यात आले. जगातील आधुनिक रेल्वे प्रणालीमध्ये आता भारतीय रेल्वेचा समावेश होत असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.





# विभागीय आयुक्तांचा वार्ड भेट समस्या समाधान अभियानाच्या माध्यमातून नागरिकांशी संवाद

**- ७५ नगरपालिकेतून नागरिक सहभागी**
**- नागरिकांच्या अडचणी तत्परतेने सोडवा- विभागीय आयुक्त दिलीप गावडे**

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/पीएम स्वनिधी, प्रधानमंत्री आवास योजना, पाणीपुरवठा तसेच नागरी क्षेत्रातील नागरिकांना येणाऱ्या अडचणीबाबत आज नागरिकांनी थेट विभागीय आयुक्तांशी संवाद साधला. विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी नागरिकांनी मांडलेल्या अडचणी तत्परतेने सोडवा, असे निर्देश यंत्रणेला दिले. प्रधानमंत्री आवास योजनेतून घरकुल मिळाल्याचा आनंद अनेक लाभार्थ्यांनी व्यक्त केला.

विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी नागरिकांशी ऑनलाइन वेबिनारद्वारे थेट संवाद साधण्यासाठीचा उपक्रम हाती घेतला आहे. नगरपालिका क्षेत्रात वार्ड भेट समस्या समाधान अभियानाच्या माध्यमातून आज संवाद साधला. यावेळी विभागीय आयुक्त कार्यालयातून अपर आयुक्त विजयसिंह देशमुख, अपर आयुक्त खुशालसिंह परदेशी, सह आयुक्त देविदास टेकाळे, सहायक आयुक्त संजय केदार उपस्थित होते.

नगरविकास विभागाच्या योजना, अडचणी, योजनेच्या अंमलबजावणीचे धोरण तसेच प्रभागातील अडचणीबाबत नागरिकांनी संवाद साधला. नगरपालिका क्षेत्रातील अनेक लाभार्थी नागरिकांनी प्रधानमंत्री आवास योजना, शबरी आवास योजना, पीएम स्वनिधी अंतर्गत पहिले कर्ज मिळाले मात्र दुसऱ्या हफ्त्याचे कर्ज मिळाले नाही तसेच ५० हजारानंतर कर्जाची मर्यादा वाढवावी, अशी मागणी बहुतांश लाभार्थ्यांनी केली आहे. याबाबतचा परिपुर्ण मागणीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याबाबत विभागीय आयुक्त श्री गावडे यांनी निर्देश दिले. धाराशिव जिल्हयातील उमरगा येथे शहरात पंधरा दिवसाला पाणीपुरवठा होत असल्याचे महिलांनी सांगितले, त्यावर स्थानिक प्रशासनाने पाणीपुरवठ्याबाबत योग्य नियोजन करून पाणीपुरवठयातील अंतर कमी करावे व पाणीपुरवठा योजना गतीने पुर्ण करावी. तसेच पावसाळयाच्या अनुषंगाने स्वच्छ पाणीपुरठयाबाबत सर्वच नगरपालिका प्रशासनाने काळजी घ्यावी, असे निर्देश देण्यात आले.



गंगाखेड परिषदेअंतर्गत येत असलेल्या लाभार्थ्यांनी पीएम विश्वकर्मा योजनेबाबत झालेल्या लाभाची माहिती दिली. धाराशिव नगरपालिका क्षेत्रात प्रधानमंत्री आवास योजनेची ९५ टक्के काम पुर्ण झाल्याचे सांगण्यात आले असून याबाबत विभागीय आयुक्त श्री गावडे यांनी समाधान व्यक्त केले. नांदेड जिल्ह्यातील अर्धापूर येथील नागरी क्षेत्रातील महिलांनी पीएम स्वनिधी पोर्टल कधी सुरू होणार तसेच याबाबत कर्जाची मर्यादा वाढवावी, अशी मागणी केली, त्यावर प्रस्ताव पाठवा, धोरणात्मक निर्णयासाठी शासनाकडे पाठविण्यात येणार असल्याचे सह आयुक्त श्री टकाळे यांनी सांगितले.

मराठवाड्यातील नगरपालिका क्षेत्रातील नागरिकांनी ऐवढ्या मोठ्या संख्येत शांततेत व शिस्तबद्ध पध्दतीने सहभाग नोंदविल्याबद्दल विभागीय आयुक्त श्री.गावडे यांनी नागरिकांचे आभार मानले. तसेच ज्या नगर पालिका क्षेत्रातील नागरिकांशी आज संवाद होऊ शकला नाही त्यांच्याशी येत्या १५ दिवसात संवाद साधणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी विभागातील आठही जिल्हयातील बहुतांश नगरपालिका क्षेत्रातील नागरिकांनी संवादात सहभाग घेतला. यावेळी जिल्हा निहाय नगरपालिकांच्या कार्याचाही आढावा घेण्यात आला.

# सिंधुदुर्ग सुपुत्र सदानंद करंदीकर यांचे दातृत्व; वीस लाखांचा निधी मुख्यमंत्र्यांकडे सुपूर्द

**मुंबई** /डोंबिवलीतून लोकलने व पुढे बसचा प्रवास करुन ते मंत्रालयात आले आणि त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे दहा लाखांचे दोन धनादेश सुपूर्द केले. पंतप्रधान निधी आणि मुख्यमंत्री सहायता निधीसाठी त्यांनी वीस लाखांची रक्कम समर्पित केली. सदानंद विष्णू करंदीकर असे या दानशूर व्यक्तीचे नाव. करंदीकर मुळचे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आचरा येथील. आयुष्यभराची कमाई समाजासाठी समर्पित करताना करंदीकर यांनी ना कुठला गाजावाजा केला, न कुठली अपेक्षा ठेवली. त्यांच्या या दातृत्वाला मुख्यमंत्री फडणवीस आणि उपस्थित उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दाद दिली. मुख्यमंत्र्यांनी कृतज्ञतापूर्वक हे धनादेश स्वीकारले आणि करंदीकर यांच्या संवेदनशीलता आणि दातृत्वाला नमन केले.



करंदीकर हे खासगी कंपनीतून निवृत्त झाले आहेत. त्यांच्या पत्नी सुमती करंदीकर शासकीय सेवेतून निवृत्त झाल्या होत्या. हे दोघेही अपत्य नसल्याने नेरुळमधील आनंद वृद्धाश्रमात रहात असत. गतवर्षी ऑगस्टमध्ये करंदीकर यांच्या पत्नीचा कर्करोगाने मृत्यू झाला. कर्करोगग्रस्तांच्या नातेवाईकांची धावपळ आणि पैशांसाठी करावी लागणारी धडपड सदानंद करंदीकर जवळून पाहिली. त्यामुळे त्यांनी पत्नीच्या स्मरणार्थ आपल्या कमाईतील मोठा भाग समाजालाच परत करण्याचा निर्णय घेतला. म्हणूनच अध्यात्मात आणि शेतीत रस असलेले सदानंद करंदीकर यांनी मंत्रालयाकडे धाव घेतली. त्यांनी मुख्यमंत्री सहायता निधीला १० लाख आणि पंतप्रधान सहायता निधीला १० लाख असा एकूण २० लाख रुपयांच्या निधीचे धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केले. सदानंद करंदीकर ८२ वर्षांचे आहेत. सध्या ते त्यांच्या भगिनी प्रभा श्रीराम शितूत यांच्याकडे वास्तव्यास आहेत. वृध्दाश्रम, कर्करोगग्रस्तांच्या कुटुंबियांची धावपळ यांचा अनुभव गाठीशी असणाऱ्या सिंधुदुर्ग सुपुत्र करंदीकर यांनी सागरा प्रमाणेच समाजाच्या ऋणातून उतराई होण्यासाठीचे आपले दातृत्वही अमर्याद असल्याचे सिद्ध केल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली.

# अकरावीच्या विद्यार्थी, पालकांसाठी आनंदाची बातमी; आता 'या' व्हॉट्सॲप चॅनलवर मिळतील सर्व प्रश्नांची उत्तरे!

इयत्ता अकरावीच्या वर्गात प्रवेशासाठी यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून संपूर्ण राज्यभर ऑनलाईन केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया राबविली जातेय. आजपासून ११ वीच्या ऑनलाईन प्रवेशप्रकीयेला सुरुवात झाली आहे. दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी आणि पालकांचे लक्ष्य आता अकरावी प्रवेशाकडे लागलंय. गेल्या वर्षीच्या शैक्षणिक वर्षापर्यंत केवळ महानगरांमध्येच ही प्रवेश प्रक्रिया राबविली जात होती. या प्रवेश प्रक्रियेतून अल्पसंख्याक कनिष्ठ महाविद्यालये वगळण्यात आली आहेत. दरम्यान विद्यार्थी आणि पालकांच्या मनातील प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी व्हॉट्सॲप चॅनल सुरु करण्यात आले आहे. या माध्यमातून तुमच्या शंका दूर केल्या जाणार आहेत.

अकरावीच्या प्रवेशाचे नवीन वेळापत्रक आज प्रकाशित होणारेय. अकरावी ऑन लाइन प्रवेश प्रक्रिया २१ तारखेपासून सुरू होणार होती. मात्र पहिल्याच दिवशी प्रवेशासाठीची वेबसाईट क्रॅश झाली. वेबसाईटवर 'साईट अंडर मेंटेनन्स'चा मेसेज येत होता..वेब साईट उघडत नसल्यामुळे विद्यार्थी त्रस्त झाले.दिवसभर हा गोंधळ सुरू होता. आज सुधारीत वेळापत्रक प्रकाशित करणार असल्यामुळे आता आज प्रवेशासाठी कोणती तारीख जाहीर होते याकडे विद्यार्थ्यांचं लक्ष लागलंय.

राज्यात यंदा अकरावीच्या प्रवेशांची एकूण क्षमता ही २० लाख ४३ हजार २५४ इतकी आहे. यामध्ये विज्ञान शाखेच्या सर्वाधिक ८ लाख ५२ हजार २०६ जागांचा समावेश आहे. या नोंदणीनंतर विद्यार्थ्यांना किमान १ ते कमाल १० कनिष्ठ महाविद्यालयांचे पसंतीक्रम नोंदविता येणार आहेत. व्यवस्थापन, इन-हाऊस व अल्पसंख्याक कोट्यातील प्रवेशासाठी प्रत्येक फेरीपूर्वी उेपीशपीं आवश्यक आहे.

शाखा आणि विभागनिहाय प्रवेश क्षमता (खपींरज्ञश उररिलळीूं)

**पुणे विभाग**
एकूण जागा --- ३,७५,८४६
कला --- १,०३,७००५
वाणिज्य --- १,०१,९७१
विज्ञान --- १,७०,१७०

**अमरावती विभाग**
एकूण जागा --- १,८६,४७५
कला शाखा --- ८०,७४०
वाणिज्य --- २४,३४०
विज्ञान ---८१,३९५

**छत्रपती संभाजीनगर**
एकूण जागा --- २,६६,७५०
--- १,११,१६५
वाणिज्य --- ४२,६१५
विज्ञान --- १,१२,६७०

**कोल्हापूर**
एकूण जागा --- १,९३,२७८
कला --- ६४,५७२
वाणिज्य ---४८,४६६
विज्ञान --- ८०,२४०

**लातूर विभाग**
एकूण जागा --- १,३७,५५०
कला --- ५२,८६०
वाणिज्य --- २१,२६०
विज्ञान --- ६३,४३०

**मुंबई विभाग**
एकूण जागा --- ४,६१,६४०
कला --- २२,९५५
वाणिज्य --- २,७२,९३०
विज्ञान --- १,६०,७१५

**नागपूर**
एकूण जागा --- २,१४,३९५
कला --- ७६,३९५
वाणिज्य --- ३८,८३०
विज्ञान --- ९९,८७०

**नाशिक विभाग**
एकूण जागा --- २,०७,३२०
कला --- ८३,०००
वाणिज्य ---३७,०२०
विज्ञान --- ८६,७३०

महाराष्ट्रातील एकूण प्रवेश क्षमता
एकूण प्रवेश क्षमता ---- २०,४३,२५४
विज्ञान शाखा --- ८,५२,२०६
वाणिज्य शाखा --- ५,४०,३१२
कला शाखा --- ६,५०,६८२

**महत्वाचे मुद्दे**

- कॅप (CAP) किंवा कोटामार्फत प्रवेश निश्चित केलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाली असे समजले जाणार
- एकदा विद्यार्थ्यांने संबंधित महाविद्यालयात प्रवेश घेतल्यास, त्याचा प्रवेश निश्चित मानण्यात येणार
- प्रवेश नोंदणी शुल्क डिजिटलमाध्यमातूनच स्विकारला जाणार
- सर्वांनी प्रवेशाच्या वेळापत्रकाचे काटेकोर पालन करणे आवश्यक
- व्यवस्थापन कोटा इन-हाऊस किंवा अल्पसंख्याक कोट्यांतील प्रवेश ६ जून २०२५ पासून सुरू होणार

अकरावी प्रवेशाच्या अधिक माहितीसाठी www.mahafyjcadmissions.in qH$dm supportmahafyjcadmissions.in येथे संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आलंय.

अकरावी प्रवेशासाठी व्हॉट्सॲप चॅनल

अकरावी प्रवेश घेण्यासाठी इच्छुक विद्यार्थी आणि पालकांसाठी व्हॉट्सॲप चॅनल सुरु करण्यात येत असल्याची माहिती शिक्षण संचालनालय, माध्यमिक व उच्च माध्यमिक, पुणे यांच्याकडून देण्यात आली आहे. इयत्ता अकरावी प्रवेश पहिल्या फेरीसाठी विद्यार्थी नोंदणी आणि पसंतीक्रम भरण्याची सुविधा सोमवार, २६ मे सकाळी ११ पासून सुरू होतेय. या प्रवेश प्रक्रियेसाठी शिक्षण संचालनालय ( माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे यांच्या तर्फे सुरू करण्यात आलंय. अधिकृत व्हॉट्स अप चॅनेल https://whatsapp.com/channel/0029VbB2T6DB-1etTOdyi10C वर सर्व अपडेट दिले जातील, अशी माहिती देण्यात आली आहे.



# जागतिक कासव दिन

२३ मे हा दिवस संपूर्ण जगात जागतिक कासव दिन म्हणून साजरा केला जातो. १९९० पासून हा दिवस संपूर्ण जगात साजरा केला जातो. आपल्या संस्कृतीत कासवाला खूप मानाचे स्थान आहे. हिंदू संस्कृतीत तर कासवाला देवाचे रुप मानले जाते. हिंदू धर्माच्या मंदिराच्या बाहेर तर कासवाची प्रतिकृती आवर्जून असते. देवाचे दर्शन घेण्याआधी भाविक कासवाचे दर्शन घेतात. आपले पूर्वज कासवाचा सांभाळ करत असत. प्रत्येक नदी, विहीर, बारव तलावात कासव वास्तवात असे, पण आज कासवाचे अस्तित्व पणाला लागले आहे. कारण शिकार, व्यापार आणि पाण्याच्या अभावामुळे कासवाचे अस्तित्व पणाला लागले आहे. अनेक दुर्मिळ जातींच्या कासवांचे अस्तित्व नष्ट झाले आहे. आज गोड्या पाण्यातून तर कासवे हद्दपारच झाले आहेत. कासवांचे अस्तित्व आता फक्त समुद्रातच पाहायला मिळते. कासव हा उभयचर प्राणी आहे. पाणी आणि जमीन अशा दोन्ही ठिकाणी कासव राहू शकतो. कासवाचे पोट आणि पाठ खूप टणक असते. समुद्रात राहणाऱ्या कासवाचे सात प्रकार आहेत त्यापैकी भारतात चार प्रकार पाहायला मिळतात.

ऑलिव्ह रिडले कासव, ग्रीन टर्टल, हॉक्स बिल टर्टल आणि आणि सागरी कासव हे ते चार प्रकार आहेत. ऑलिव्ह रिडले कासव हे तपकिरी रंगाचे असून ते महाराष्ट्र आणि ओरिसाच्या समुद्र किनाऱ्यावर आढळतात.

ग्रीन टर्टल कासव म्हणजे हिरव्या रंगाचे कासव हे पूर्व आणि पश्चिम किनाऱ्यावर आढळतात. हॉक्स बिल टर्टल म्हणजे चोची सारखे तोंड असलेले कासव अंदमान निकोबारच्या बेटावर आढळतात तर सागरी कासव हे सर्व समुद्रात आढळतात. समुद्रातील कासवांची देखील आता मोठ्या प्रमाणात शिकार होऊ लागली आहे. कासवांच्या पाठीचा दागिन्यांसाठी वापर केला जातो. तसेच कासवांच्या पाठिपासून ढालीही बनवल्या जातात. चामड्याच्या तसेच शोभेच्या वस्तू बनवण्यासाठी कासवांच्या त्वचेचा वापर केला जातो. काहीजण आपल्या घरात शोभेसाठी कासव पाळतात. या सर्व कारणांनी कासवांची शिकार होते. कासवांची शिकार बेकायदेशीर असूनही कासवांची शिकार होते हे विशेष. कासवांचे संवर्धन करण्यासाठी वेळास येथे कासव संवर्धन केंद्र उभारण्यात आले आहे. वेळास येथे दरवर्षी कासव महोत्सवही आयोजित केला जातो. सिंधुदुर्ग जिल्ह्यात ऑलिव्ह रिडले कासवांचे प्रजनन आणि संवर्धन होते.

कासवांचे आयुष्य १०० ते १५० वर्ष इतके असते. मात्र शिकारीमुळे अनेक कासवे अकालीच मरण पावतात. कासवांचे अस्तित्व जमीन आणि पाण्यातील जीवनसाखळीसाठी अत्यंत महत्वाचे आहे. कासवांचे अस्तित्व टिकणे ही काळाची गरज आहे. जर पृथ्वीवरून कासवांचे अस्तित्व नष्ट झाले तर त्याचा पर्यावरणावर मोठा परिणाम होऊ शकतो. कासव हा वन्यजीव असल्याने त्याला घरात बंदिस्त करणे, त्याची हत्या करणे, शिकार करणे हे वन्यजीव कायद्यानुसार गुन्हे आहेत त्यामुळे असे गुन्हे करताना कोणी आढळल्यास त्याची पोलिसांकडे तक्रार करणे हे देशातील नागरिकांचे कर्तव्य आहे.

कायद्याचे अस्तित्व टिकवण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणे, कासवांचे संरक्षण आणि संवर्धन करणे हाच जागतिक कासव दिन साजरा करण्यामागचा उद्देश आहे. हा उदेश यशस्वी व्हावा असे वाटत असेल तर प्रत्येकाने कासवांचे संरक्षण आणि संवर्धन करायला हवे.

# भारत शौर तिरंगा यात्रा कन्नडला उत्सवात साजरी

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड प्रतिनिधी/उदय कुलकर्णी**/ राष्ट्रप्रेमाची प्रचिती देणारी भारत शौर तिरंगा यात्रा कन्नड नगरीत मोठ्या उत्सवात साजरी करण्यात आली आहे.



सदरची भव्य यात्रा कन्नड तालुक्याच्या शिवसेना आमदार सौ.संजनाताई जाधव व विविध संत महंत यांचे नेतृत्वात शहरातील मुख्य असलेल्या पिशोर नाक्यापासून प्रारंभ होऊन तहसील कार्यालयाचे परिसरात असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांचे उद्याना पर्यंत काढण्यात आली.या मार्गांवर असलेल्या स्वतंत्रवीर लोकमान्य टिळक,घटनावीर डॉ.बाबासाहेब आंबेडकर,महात्मा ज्योतिबा फुले,सावित्रीबाई फुले,आण्णा भाऊ साठे यांना अभिवान करून तसेच वीर शूरवीरांच्या अमर स्मृतींना अभिवादन करून भारत मातेच्या चरणी नतमस्तक झाले होते.

या निघालेल्या भव्य -दिव्य ऱ्यांलीत आमदार सौ.संजनाताई जाधव,भाजपाचे जिल्हाध्यक्ष संजय खांबयते,कन्नड भाजपाचे सर्वेसर्वा डॉ.संजय गव्हाणे,अनु. जा.ज.जिल्हाध्यक्ष संजय गव्हाणे,मा.जि.प.अध्यक्ष आण्णासाहेब शिंदे,अंधानेरचे सरपंच अशोक दापके,डॉ. सादाशिव पाटील,अवचित नाना वळवळे,मा.नगरसेवक कवडे काका,राष्ट्रवादी पक्षाचे सर्वेसर्वा भैयाजी सह तालुकाभराती महान योगी,महंत, राष्ट्रप्रेमी नागरीक,युवक तरुण, तरुणी,विद्यार्थी समाजीक कार्यकर्ते तसेच विविध पक्षांचे मान्यवर या या भारत शौर यात्रेत सहभागी झाले होते.या निघालेल्या भव्य तिरंगा यात्रेच्या माध्यमातून देशभक्ती,एकात्मता आणि राष्ट्रीय स्वाभिमान याचा भव्य जागरच घडविण्यात आला होता.

हातात तिरंगा तर हृदयातून भारत मातेचा जायघोष व वंदे मातरमचा आवाज सर्वत्र दुमदुमत होता.यात बंजारा समाजांच्या महिला बगिनींनी केलेल्या पेहराव व साधू संतांची उपस्थिती सर्वांचे लक्ष वेधून घेत होती.

या ऱ्यांलीत सर्व समाजाच्या समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून देशाविषयी आपले प्रेम प्रगट केल्याचे दिसून आले.हा इतक्या जनसमुद्यात प्रथमच निघालेला भव्य सोहळा संपूर्ण कन्नड नागरीतील नागरिकांचे लक्ष वेधून घेणारा होता.

## नादरपुर येथे गावात घरावर झाड कोसळल्याने दोन कुटुंब आले उघड्यावर...

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड ग्रामीण प्रतिनिधी/सुनिल निकम**/मान्सूनपूर्व पावसाने अवकाळी पावसाने सर्वत्र कहर केला असून कन्नड तालुक्यातील नादरपुर येथे बुधवार दिनांक २१ मे रोजी झालेल्या वादळी वाऱ्यासह पावसामुळे गावातील पत्र्याच्या घरात राहणारे दोन कुटुंब झोपेत असताना अचानक मोठे झाड कोसळल्याने दोन कुटुंब उघड्यावर आले आहे . ग्रामस्थांच्या मदतीमुळे कोणतीही जीवित हानी झाली नाही. मात्र अन्न वस्त्र आणि निवाऱ्याची व्यवस्था याची मोठी हानी झाली आहे. घरातील संपूर्ण संसार वस्तूंचे नुकसान झाले आहे. आम्हाला घरकुल मंजूर झालेले आहे मात्र वाळू अभावी आमचे घराचे काम अर्धवट असल्याचे मत या कुटुंबातील व्यक्तींनी व्यक्त केले.

शासनाने आम्हाला घर दिले मात्र घर बांधण्यासाठी वाळूची व्यवस्था नसल्याने आज आमच्यावर ही वाईट परिस्थिती निर्माण झाले असे मत आपत्तीग्रस्त व्यक्तींनी व्यक्त केली. ग्राम महसूल अधिकारी सीमा रांजळे यांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला.यावेळी ग्राम विकास अधिकारी सुभाष बनकर,कोतवाल सुभाष ईमले ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच सर्व सदस्य ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हवामान तज्ञ पंजाबराव ढख साहेब यांनी नादरपूर फाटा येथे भेट

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड ग्रामीण प्रतिनिधी/सुनिल निकम/** कन्नड तालुक्यातील नादरपुर येथे महाराष्ट्रातील हवामान तज्ञ पंजाबराव ढख साहेब यांनी नादरपुर येथे धावती भेट दिली गुरुवारी ( २२ मे ) कन्नड कडे येथे जात असताना त्यांनी पृथ्वी अग्रो सर्विसेस नादरपुर फाटा यांच्या दुकानाला भेट दिली त्यांचे स्वागत करण्यात आले या वेळी नादरपूर गावकऱ्यांच्य वतीने सत्कार करण्यात आला या वेळी सुनिल निकम पत्रकार दीपक निकम संदीप निकम अजय निकम सोमीनाथ निकम ज्ञानेश्वर निकम राजू निकम भगवान निकम बंडू निकम किशोर निकम आजीनथ निकम ज्ञानेश्वर काथार भागिनाथ सपकाळ अतुल काचोळे अरुण जाधव इन्वेस्टमेंट कंपनी मार्फत चिंतामण सोनवणे हे होते आजिनाथ भडगे विष्णू काचोळे वैभव काथार गणेश निकम ज्ञानेश्वर जाधव बाळु निकम योगेश निकम या वेळी ग्रामपंचायत उप सरपंच सागर निकम व सदस्य तंटामुक्त अध्यक्ष गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

# पावसामुळे होणारे विद्युत अपघात टाळण्यासाठी घ्या खबरदारी महावितरणचे नागरिकांना आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी/** पावसामुळे होणारे विद्युत अपघात टाळण्यासाठी नागरिकांनी सुरक्षिततेचे सर्व नियम पाळण्याचे व खबरदारी घेण्याचे आवाहन महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलाच्या वतीने करण्यात आले आहे.

पाऊस व जोरदार वाऱ्यामुळे तुटलेल्या फांद्या वीजवाहक तारांवर अडकून पडल्यास त्या स्वत: काढण्याचा प्रयत्न करू नये. तसेच झाडे पडल्याने वीजखांब वाकला वा मोडला जातो. परिणामी वीजतारा तुटण्याचे प्रकार घडतात. त्यात वीजप्रवाह असण्याची शक्यता असल्याने अशा तुटलेल्या, लोंबकळणाऱ्या वीजतारांपासून सावध राहावे. या तारांना हात लावण्याचा किंवा हटवण्याचा प्रयत्न करू नये आणि त्वरित महावितरणशी संपर्क साधावा. घरात बसवलेल्या मीटरवर पाणी पडत असल्यास किंवा मीटर असलेली भिंत ओली असल्यास त्वरित महावितरणशी संपर्क साधावा. घरामध्ये असलेली विद्युत यंत्रणा व घराजवळ असलेली अर्थिंग मान्यताप्राप्त कंत्राटदाराकडून तपासून घ्यावी. मीटर बोर्डापासून मोटारीपर्यंत जाणाऱ्या केबलसना जोड देऊ नये.

तारेच्या कुंपणातून येणाऱ्यास प्रतिबंध करण्यासाठी काहीजण त्यात वीजप्रवाह सोडतात. ते सर्वांना अत्यंत धोकादायक आहे. असे प्रकार कटाक्षाने टाळावेत. चालू स्थितीतील मोटार यंत्र उचलून दुसऱ्या जागी हलवू नये. अंगणात, परसदारी दिवा लावण्यासाठी फ्लेक्झिबल वायर पत्र्यावरून अथवा धातूच्या दारातून अँगलला गुंडाळून नेणे धोकादायक आहे. त्यामुळे सर्व धातूच्या वस्तू विद्युत प्रवाहित होऊ शकतात. घराचे बांधकाम विद्युत वाहिनीखाली अथवा सुरक्षित अंतरापेक्षा कमी अंतरावर करू नका. पोल अर्थिंगच्या वायर्स तोडू नका. त्यामुळे शॉक लागण्याची शक्यता आहे. उंच धातूच्या वस्तू नेताना मार्गातील विद्युत तारांना स्पर्श होणार नाही याची खबरदारी घ्यावी. ट्रक अथवा उंच वाहनांच्या टपावर बसून प्रवास करू नये.

झाड किंवा फांद्या तोडताना त्याच्याजवळ अथवा सानिध्यात विद्युत तारा येत नाहीत ना याची खबरदारी घ्यावी. अशा तारा असतील तर त्यातील वीज प्रवाह महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांकडून बंद करून, सुरक्षित करून मगच अशा फांद्या तोडाव्यात. ग्राहकांनी कोणत्याही विद्युत खांबांना, तारांना, वाहिन्यांना, रोहित्रांना व अन्य उपकरणांना स्पर्श करू नये. तसेच विद्युत खांबांना व उपकरणांना जनावरे बांधू नयेत. त्यास दुचाकी टेकवून ठेवू नयेत किंवा विद्युत खांबांना तार बांधून कपडे वाळत घालू नयेत. घरात शॉर्टसर्किट झाल्यास मेन स्विच तात्काळ बंद करावा. घरावरील दूरचित्रवाणीची डिश किंवा अँटेना वीज तारांपासून दूर ठेवावा.

ओल्या कपड्यांवर विजेची इस्त्री फिरवू नये. विजेचे स्विच बोर्ड किंवा कोणत्याही उपकरणाला पाणी लागणार नाही याची दक्षता घ्यावी. विशेषत: टिन पत्र्याच्या घरात राहणाऱ्या नागरिकांनी पावसाळ्यात अतिदक्ष राहून विजेपासून सुरक्षित राहण्यासाठी उपाययोजना कराव्यात. विद्युत वाहिनीवर आकडा टाकून विद्युतपुरवठा घेण्याचा प्रयत्न करू नये.

शेतातील पिकांचे वा फळबागेचे जंगली जनावरांपासून संरक्षण करण्याकरिता तारेच्या कुंपणामध्ये अनधिकृतपणे वीजप्रवाह सोडू नये. अशा प्रकारे जीवित हानी झालेली आहे. पूर किंवा अतिवृष्टीमुळे कोणत्याही क्षणी प्रतिकूल स्थिती निर्माण होण्याची शक्यता असल्याने खबरदारीचा उपाय म्हणून रोहित्र आणि फिडर बंद करण्यात येतो. त्यामुळे वीजपुरवठा काही कालावधीसाठी बंद होतो. त्यामुळे ग्राहकांच्या वीजपुरवठा बंद होण्याच्या तक्रारी वाढतात. अशा स्थितीत संभाव्य धोका/अपघात टाळण्यासाठी नागरिकांनी महावितरणला सहकार्य करावे.

शहरी व ग्रामीण भागातील वीजग्राहकांसाठी २४ तास सुरू असणाऱ्या कॉल सेंटर्सचे १९१२, १८००-२१२-३४३५ किंवा १८००-२३३-३४३५ हे टोल फ्री क्रमांक उपलब्ध आहेत. तसेच मंडल कार्यालयात दैनंदिन संनियंत्रण समितीचे कक्ष २४ तास कार्यान्वित करण्यात आलेले आहेत. त्यांचे मोबाईल क्रमांक पुढीलप्रमाणे आहेत. छत्रपती संभाजीनगर शहर मंडल - ७०६६०४२४१२, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण मंडल - ७८७५७५६६५२. अतिवृष्टी किंवा वादळामुळे वीजपुरवठ्यात तांत्रिक बिघाड होऊन दुर्घटना होण्याची शक्यता आहे अशा ठिकाणांची माहिती टोल फ्री क्रमांकांवर तसेच नियंत्रण कक्षास देण्यात यावी, असे आवाहन महावितरणने केले आहे.

# विवाह कोणताही करा ; फक्त मायबापाची सेवा घडावी

सध्या आंतरजातीय विवाह होतात. ते काही दिवस टिकतात व काही दिवसानंतर त्या दोघांत वाद तयार होतात व त्याची परियंती घटस्फोटात होते. म्हणूनच लोकांचा आंतरजातीय विवाहाला विरोध असतो. शिवाय त्याला एक जोड दिली जाते. ती म्हणजे सेवेची. म्हटलं जातं की आंतरजातीय विवाह करणारी मंडळी ही वृद्ध, जन्म देणाऱ्या मायबापाची सेवा करीत नाहीत. तसं पाहिल्यास असे घटस्फोट जातीच्या विवाहातही होतात. अन् राहिली जन्मदात्याची सेवा. तर ती सेवाही जातीत विवाह करणारे करीत नाहीत. तेही आपल्या जन्मदात्या आईवडीलांना वृद्धाश्रमात टाकतात. अन् समाज विनाकारण आंतरजातीय विवाह करणाऱ्या लोकांना बदनाम करीत असतो.*

सध्या आंतरजातीय विवाह होवू लागले आहेत व देशालाही तेच अपेक्षीत आहे. त्यासाठी कायदेही बनवले आहेत. त्याचं कारण येथे जातविवाहात चालत आलेल्या परंपरा नाहीत तर त्याला कारण आहे हुंडा पद्धती आणि जातीच्या विवाहात येणारा खर्च.

अलिकडील काळात लोकांच्या जातीवर आधारीत विवाहात अमाप खर्च येतो. ज्यासाठी कर्ज काढावे लागते. ते कर्ज सालोंसाल फेडत बसावे लागते. अशा खर्चात ना अनुदान मिळत ना काही. कर्जाचे हप्तेही वाढत असतात. शिवाय दिवसेंदिवस गरिबी येत असते. एकवेळ अशी येते की ज्यानं कराज काढले. त्या परिवाराला कर्जापायी आपली शेती, घरदार गमवावे लागतात. कधीकधी आत्महत्याही कराव्या लागतात. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी याच गोष्टीचा अभ्यास केला व सन १९५४ पासून आंतरजातीय विवाहाला मान्यता देवून कायद्यात तशा प्रकारची तरतूद केली व आंतरजातीय विवाह करणाऱ्यांना बक्षीस म्हणून विशेष अनुदानाची तरतूदही केली. तेव्हापासून राजरोषपणे आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह होत आहेत. याचा अर्थ पुर्वी आंतरजातीय विवाह होत नव्हते काय? पुर्वीही आंतरजातीय विवाह होतच होते. नल दमयंती, जोधा अकबर, द्रौपदी पांडव, शांतनू सत्यवती अशी बरीच आंतरजातीय विवाहाची उदाहरणं आहेत की जी पुर्वीच्या काळात घडून आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही आंतरजातीय विवाह केलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आंतरजातीय विवाह केला. त्याचं कारण होतं जातीभेद आणि अस्पृश्यता निवारण करणं. कारण तो काळ असा होता की अस्पृश्यांना सामाजिक जीवन जगतांना कोणत्याच स्वरुपाचा वाव नव्हता. भेदभावपूर्ण वातावरण होतं व त्या वातावरणात अस्पृश्य समाज अगदी पिंजून जात होता. स्पृश्यांचे काही नियम होते व त्या नियमांचे अस्पृश्यांनी उल्लंघन केले तर त्यांना कडक शिक्षा केल्या जात असत. ज्यात अस्पृश्यांचे जीवही जात असत. अशावेळेस ही अस्पृश्यता मिटावी. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आंतरजातीय विवाह केला व सविता माई आंबेडकरांच्या पत्नी बनल्या. त्यानंतरही आंतरजातीय विवाहाबाबत बरीच प्रकरणं घडली. त्या प्रकरणात कित्येक आंतरजातीय विवाह करणाऱ्यांचे जीवही गेलेत. असं होवू नये म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना नाईलाजास्तव १९५४ मध्ये संविधानात आंतरजातीय विवाहाच्या कलमांचा समावेश करावा लागला. त्या कलमांचा समावेश करण्याचा लोकांना ला पुढे फायदाही मिळाला. कायद्यानुसार पोलीस संरक्षण मिळाल्यानं आंतरजातीय विवाह करणाऱ्यांचे जीवही वाचले. वाळीत टाकणे बंद झाले व आंतरजातीय विवाह करणारे राजरोषपणे जीवन जगू लागले. आज आंतरजातीय विवाह करणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. कायद्यानंही या विवाहाला मान्यता प्रदान केलेली आहे. परंतु हे जरी खरं असलं तरी आजही या विवाहाला कायद्यानुसार मान्यता आहे. राजमान्यताही आहे. परंतु जातीची मान्यता नाही. कारण जातीची बरीच मंडळी, आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्याला आयुष्यभर स्विकारत नाहीत. ते त्यांचा रागच करीत असतात आणि प्रसंगी आजही बऱ्याच ठिकाणी आंतरजातीय विवाह करणाऱ्यांची कत्तल केली जाते. हीच बाब लक्षात घेवून सरकारनं नुकतेच या कायद्यात बदल करुन आंतरजातीय विवाह करणाऱ्यांना सहा महिने पोलीस संरक्षण प्रदान केले आहे. आता आंतरजातीय विवाह करणाऱ्यांना कुटूंब व समाजाकडून काही त्रास उद्भवल्यास व त्यांनी तशी तक्रार केल्यास कारवाई निश्चीत होणार आहे.

सध्याच्या परिस्थितीत आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहाला संरक्षण मिळाले आहे. जात मिटवणे हा यात उद्देश असून राष्ट्रीय एकात्मता निर्माण करणे हा यात एकमेव उद्देश आहे. शिवाय जातीअंतर्गत कालापकाल जे विवाह व्हायचे. ते विवाह रक्तसंबंधात व्हायचे. ज्यातून आनुवांशिक रोग वाढीस लागायचे. ते आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह केल्याने समूळ नष्ट होणार आहे. असं सरकारचं मत. परंतु हे मत येथील तमाम जात विवाह करणाऱ्या लोकांना मान्य नाही. ते आजही अशा विवाहाला नाकारतात. जात नष्ट होवू नये असं त्यांचं मत. त्याचं कारणही समाज देतो. जात जर नष्ट झालीच तर समाज नष्ट होईल व समाज जर नष्ट झालाच तर पुढं संस्कार. विवाहाला कराराचे स्वरुप प्राप्त होईल असं समाजाचं मत. त्यावर अधिक स्पष्टीकरण देत समाज म्हणतो की जातविवाह जर झाले तर संस्कार दूर पळतील. कुसंस्कार वाढतील. त्याला पुरावा देतांना ते म्हणतात की जातीचे विवाह हे रक्तसंबंधावर आधारीत असून असे जेव्हा विवाह होतात. त्यावेळेस जातीअंतर्गत दबाव असल्यानं असे विवाह हे सहजासहजी तूटत नाहीत. त्याला बळकटी प्राप्त होते. शिवाय जातीच्या नियमानुसार वृद्ध माता पित्यांची सेवा ही कुटूंबातच होते. त्यांना वृद्धाश्रमात जावे लागत नाही. कारण रक्तसंबंध असतात. आंतरजातीय विवाहातून असे रक्तसंबंध नसल्यानू वृद्ध मातापित्यांची सेवा घडत नाही. त्यामुळंच नाईलाजास्तव वृद्ध मातापित्यांना वृद्धाश्रमात जावे लागते व वृद्धाश्रमाची संख्या वाढते. तसं पाहिल्यास समाजाचंही म्हणणं बरोबरच आहे. कारण सध्या अलिकडील काळात वृद्धाश्रमाची संख्या वाढलेली आहे. ती आणखी वाढतच आहे आणि ती चिंतेची बाब ठरत आहे. आज वृद्ध मातापित्याची सेवा कुणीच करायला तयार नाहीत व ते सरळ वृद्धाश्रमात जात आहेत. स्वतः त्यांच्या पोटातून जन्म घेतलेली मुलं आपल्या जन्मदात्या मातापित्यांना राजरोजपणे वृद्धाश्रमात टाकत आहेत. त्यांना वृद्धाश्रमात टाकण्याचे प्रमाण हे सुशिक्षित लोकांमध्ये जास्तच आहे व आंतरजातीय विवाह करणाऱ्या परिवारात जास्तच आहे. विशेष सांगायचं झाल्यास विवाह कोणताही करावा. कोणी कोणताही विवाह करो. आपल्याला काय, आपण फक्त त्याचा संबंध भात खाण्याशीच ठेवावा. त्या विवाहाबाबत कुणातही संभ्रम असूच नये. जसा जातीचा विवाह महत्वाचा आहे. तसाच महत्वाचा आहे आंतरजातीय विवाह आणि तेवढाच महत्वाचा आहे आंतरधर्मीय विवाह. असंच सर्वांनी समजून घ्यावं. कोणालाही कोणत्याही स्वरुपाचा फरक पडू नये. फरक त्यांनाच पडेल, जो विवाह करीत असेल, त्यांना संसार करायचा असतो. हं, एवढं नक्कीच सांगावं की बाबा रे, विवाह आपल्या मनानुसार केला ना. आता टिकव. समाजाला दाखव की मी केलेला विवाह बरोबर आहे व मी योग्यच जोडीदाराशी विवाह केलेला आहे. हं, शेवटी असंच सांगेन की आपण ज्याही कोणासोबत विवाह केलेला असेल, त्यांनी आपल्या मायबापाची सेवा करावी म्हणजे झालं. कारण त्यांनीच तुम्हाला जन्म दिलाय. हेही खरं आहे.

**- अंकुश शिंगाडे नागपूर**

# नैसर्गिक झऱ्यांची गणना; आपल्या भागातील झऱ्यांची माहिती कळवा – भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणेचे आवाहन

**आत्ताच ऐसप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी/** जल संसाधन, नदी विकास आणि गंगा संरक्षण मंत्रालयाच्या वतीने देशातील पहिली झऱ्यांची गणना सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या गणनेसाठी भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणाला नोडल एजन्सी म्हणून नियुक्त केले आहे.

दरम्यान जिल्ह्यात ही गणना दि.१५ पासून सुरु झाली असून नागरिकांनी आपापल्या भागातील झऱ्यांची माहिती कळवावी, असे आवाहन भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणेचे वरिष्ठ भूवैज्ञानिक जीवन बेडवाल यांनी केले आहे.

**अशी होईल गणना**

वरिष्ठ भूवैज्ञानिक बेडवाल यांनी माहिती दिली की, सन २०२३-२४ च्या कृषी वर्षाला संदर्भ वर्ष म्हणून मानून झऱ्यांची पहिली गणना केली जाईल. जिल्ह्यात ही गणना सुरु झाली असून ती आगामी वर्षभर (कृषी वर्ष) चालेल. ही गणना पूर्णपणे डिजिटल पद्धतीने केली जात आहे. मोबाईल अप्लिकेशनद्वारे डेटा संकलन आणि वेब अप्लिकेशनद्वारे डेटा प्रमाणीकरण आणि देखरेख केली जाणार आहे. गणनेच्या वेब अप्लिकेशनमध्ये रिअल टाइम प्रगती दर्शविणारा डॅशबोर्ड देखील समाविष्ट केला आहे. ग्रामीण आणि शहरी भागात अनुक्रमे गाव आणि वॉर्ड हे गणनेचे प्राथमिक क्षेत्र एकक असेल. जंगलात असलेले झरे जवळच्या गावात/वॉर्डमध्ये घेतले जातील. देशभरातील सर्व प्रशासकीय युनिट्सची यादी करण्यासाठी स्थानिक सरकारी निर्देशिका (डऋऊ) कोड वापरुन जनगणना केली जात आहेत. प्रगणनासाठी तालुकास्तरावरील गट विकास अधिकारी, ग्राम स्तरावरील ग्राम सेवक, सरपंच, तलाठी, कोतवाल, शिक्षक यांना सहभागी करून गणनेचे कामे करण्यात येत आहेत.

**झऱ्यांच्या गणनेची आवश्यकता**

नीती आयोगाच्या कार्यगटाच्या अहवालानुसार, देशभरातील सुमारे २० कोटी लोक झऱ्याच्या पाण्यावर अवलंबून आहेत. प्रामुख्याने भारतीय हिमालयीन प्रदेश, पश्चिम घाट (सह्याद्री पर्वतरांगा, महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, केरळ आणि तामिळनाडू), पूर्व घाट (उत्तर ओडिशा, आंध्र प्रदेश आणि तामिळनाडू) आणि मध्य भारत (सत्पुरा आणि विंध्य पर्वत) या भागातील लोक. अहवालानुसार, भारतातील १५% पेक्षा जास्त लोकसंख्या त्यांच्या पाण्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी झऱ्यांच्या पाण्यावर अवलंबून आहे.

ही परिस्थिती विशेषतः पर्वतीय भागात, गावे/वस्त्या स्थानिक कड्यावर स्थित असतात तेथे असते. धोरणात्मक आणि सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून पाहिल्यास, हे असे क्षेत्र आहेत जिथे नद्या खोल दऱ्यांमध्ये वाहतात आणि हिमनद्या पर्वतांमध्ये उंचावर असतात, म्हणून या दोन्ही स्रोतांमधून पाणी काढणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे नसते. त्यामुळे या लोकांना झऱ्यांच्या पाण्यावर अवलंबून रहावे लागते.

अशा भागांमध्ये ग्रामीण समुदायांच्या पिण्याच्या, आणि घरगुती पाण्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी स्थानिक झरे हा एकमेव स्रोत आहे. या व्यतिरिक्त, हे झरे पावसाळ्यात अनेक नद्यांमध्ये वाहतात. झऱ्यांचे पाणी हेच नदीचे स्रोत असतात. भारतातील पर्वतीय प्रदेशांमध्ये, जेव्हा मोठ्या नद्या देखील पाणी पुरवण्यात अपयशी ठरतात, तेव्हा हे लहान जलस्रोत महत्त्वाची भूमिका बजावतात.

**भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणाला नोडल एजन्सी**

झऱ्याचे हे महत्त्व लक्षात घेता, २०१८ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'जल सुरक्षेसाठी हिमालयातील झऱ्यांचे इन्व्हेंटरी अँड रिव्हायव्हल ऑफ वॉटर सिक्युरिटी' या निती आयोगाच्या कार्य गट-१ द्वारे झऱ्यांची मॅपिंग प्रगणना आयोजित करण्याच्या गरजेवर जोर देण्यात आला आहे. त्यानुसार, देशाच्या पर्वतीय आणि डोंगराळ भागांमध्ये जलसुरक्षा टिकवून ठेवण्यासाठी झऱ्यांचे महत्त्व लक्षात घेऊन, जल संसाधन, नदी विकास आणि गंगा संरक्षण मंत्रालयाने केंद्र पुरस्कृत देशातील पहिली झऱ्याची गणना सुरू करण्याचा निर्णय घेतला. झऱ्याची पहिली जनगणना करण्यासाठी भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणाला नोडल एजन्सी म्हणून नियुक्त केले आहे. देशात सद्यस्थितीत जलस्रोतांसाठी गणना सुरु आहेत. त्यात झऱ्यांची पहिली गणना, पाटबंधारे विभागामार्फत लघु प्रकल्पांची ७ व गणना, जलशयांची दुसरी गणना, मोठ्या व मध्यम प्रकल्पांची पहिली गणना होत आहे.

**झऱ्यांची माहिती कळविण्याचे आवाहन**

झरा म्हणजे पृथ्वीच्या पृष्ठभागावर नैसर्गिकरित्या निर्माण होणाऱ्या भूजलाचा केंद्रित विसर्जन. सर्वसाधारणपणे झरे हे मुक्त प्रवाह किंवा गळणारे झरे म्हणून पाहिले जाऊ शकतात. एकेंद्रित प्रवाहाने वैशिष्ट्यीकृत मुक्त वाहणारे झरे व्यतिरिक्त, खडकांमधील पारगम्य गाळ किंवा फ्रॅक्चरमधून लहान आणि स्थानिक भूजल गळती होतात.

ज्यामुळे स्थानिक भागात वेगवेगळ्या नावांनी ओळखले जाणारे पाण्याचे तलाव तयार होतात. आपल्या भागात आसपास झरे असल्यास त्याची माहिती भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेस कळवावी.



माहिती कळविण्यासाठी संपर्क क्रमांक. ८००७४०१४०८.

**जिल्ह्यात आतापर्यंत आढळले १३ झरे**

जिल्ह्यात आतापर्यंत झालेल्या गणनेत १३ झरे आढळून आले आहेत. त्यात सिल्लोड तालुक्यात २, फुलंब्री तालुक्यात १, खुलताबाद तालुक्यात ४, कन्नड तालुक्यात ६ झरे आढळून आले आहेत. अद्याप गणना सुरु आहे. ब्रिटीश राजवटीत संपूर्ण देशाच्या मोजणीचे आणि भुपृष्ठ नकाशे तयार करण्याचे काम १९१० मध्ये सुरु करण्यात आले होते. त्यावेळी काही झऱ्यांच्या नोंदी ह्या त्या नकाशांवर आहेत. कालौघात त्यातील काही झरे लुप्त होतात किंवा काही मार्ग बदलतात. त्याचीही तपासणी या गणनेत होईल, असे सहा. भुवैज्ञानिक डॉ. आहेर यांनी सांगितले.

**झरा कशाला म्हणाल?**

पाण्याचा झरा म्हणजे अशा जागेला म्हणतात जिथे भूजल नैसर्गिकरित्या पृष्ठभागावर वाहते. ते मूलतः भूगर्भातील पाण्याचे आउटलेट असते, जे बहुतेकदा नैसर्गिक विहीर किंवा ओढ्यासारखे दिसते. हेच भूजलाचे पृष्ठभागावरील प्रकटीकरण असलेले झरे हे पवर्तांमधून वाहत येत असतात,असे सहायक भूवैज्ञानिक डॉ. कैलास आहेर यांनी सांगितले.

## मान्सूनपूर्व पाऊसातच कन्नडचे बस स्थानक खड्यांच्या विळख्यात;स्थानिक प्रशासन मात्र ढिम्म..



**आत्ताच एक्सप्रेस**
**कन्नड प्रतिनिधी / उदय कुलकर्णी/** मान्सूनपूर्व पावसाचा तडखा बसताच कन्नड बस स्थानक पूर्णतः खड्ड्यात गेले आहे.

आमचे प्रतिनिधीने दि.२२ रोजी सदर स्थानकात सकाळी फेरफटका मारला असता प्रवाशांच्या सोयीसाठी असणाऱ्या बस स्थानकात नको इतके खड्डे पडले असुन प्रवाशांना गाडी पकडतांना मोठी कसरत करावी लगत आहे.

सदर बस स्थानकात मोठ्या प्रमाणात मोठ मोठी खड्डे पडली असुन त्यात पाऊसाचे पाणी साचले आहे.त्यातून प्रवाशांना मार्ग काढतांना मोठी कसरत करावी लगत आहे.त्यातच स्थानकात बहुतांशी ठिकाणी कचऱ्यांचे ठिग सुद्धा साचले असुन स्थानक दुर्गंधीने व्यापले आहे.सदर ठिकाणी मोकाट प्राण्यांचाही मोठ्या प्रमाणात सुळसुळाट दिसून आला. सदर स्थानकाच्या आस्थापना विभागाकडुन याकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येत आहे.

प्रवाशांच्या आरोग्याच्या दृष्टीकोनातून ते अत्यंत घातक आहे.चालकालाही आपली गाडी प्लेटफार्मवर लावतांना कसरत करावी लगत आहे.तर प्रवाशांना त्याही पेक्षा गाडीत चढतांना कसरत करावी लगत आहे.

सदर सर्व दुर्लक्षित प्रकाराकडे वरिष्ठ अधिकारी वर्गाने लक्ष घालून प्रवाशांना होणाऱ्या त्रासापासून मुक्त करावे,अशी मागणी मोठ्या प्रमाणात होतांना दिसून येत आहे.

## सावळदबारा येथे नेत्र तपासणी शिबीर संपन्न



**आत्ताच एक्सप्रेस**
**सावळदबारा प्रतिनिधी/** आशीर्वाद नेत्रालय बुलढाणा जापान व जर्मन मशीन द्वारे नेत्र तपासणी करण्यात आली सावळदबारा येथे गावातील लोकांनी नेत्र तपासणी करून घेतली. तसेच ४५ लोकांनी नेत्र तपासणी चा लाभ घेतला . तसेच गावातील ग्रामस्थ डॉक्टर. हजर होते गजानन बोबडे. दीपक माळी. सुरेश खराटे. सुरज अंभोरे. अंशू माळी. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे तालुका संघटक गुलाबराव कोलते. निलेश चोपडे. पांडुरंग अंजुळे . सरवर तडवी. कालेखा पठाण. गोपाल सपकाळ. गणेश पाटील. व ग्रामस्थ हजर होते.

## संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांकडून मंजुरी पत्र मागण्याची अट रद्द करा – कैलास निकम पाटील

**आत्ताच एक्सप्रेस**
**गंगापूर/ प्रतिनिधी/ सुभान शहा/** श्रावणबाळ संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांकडून मंजुरी पत्र मागण्याची अट रद्द करावी संग्राम कैलास निकम पाटील यांनी आमदार प्रशांत बंब यांच्याकडे मेलद्वारे व व्हाट्सअप द्वारे निवेदन पाठवून मागणी केली आहे. शिवसेना दिव्यांग (अपंग) सहाय्यक सेना संग्राम कैलास निकम पाटील गंगापूर तालुका संघटक यांनी अशी मागणी केली आहे की. गंगापूर तहसील कार्यालयात दिव्यांग बांधवांना दर वर्षी प्रमाणे हयात पत्र देण्यात येते ते आता सुरू झाले आहे. परंतु आता हयात पत्र देण्यासाठी संजय गांधी निराधार योजना विभागातील अधिकारी मंजुरी पत्राची मागणी करत आहे. परंतु काही दिव्यांग यांच्याकडे मागील १५ ते २० वर्षापासून संजय गांधी निराधार व श्रावण बाळ निवृत्ती वेतन योजनेचा लाभ घेत आहे. त्यांना आज रोजी हयात पत्र संजय गांधी विभागात जमा करण्यासाठी अधिकाऱ्याकडून मंजुरी पत्राची मागणी केली जात आहे. परंतु पंधरा ते वीस वर्षापासून जे लाभार्थी लाभ घेत आहे. त्यांच्याकडे सदर मंजुरी पत्र उपलब्ध नसल्यामुळे अधिकारी त्यांची अडवणूक करत आहे. यामुळे संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांना योजनेच्या लाभांपासून वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी माननीय प्रशांत बंब साहेब यांनी मागणी करण्यात आलेल्या पत्राची तात्काळ दखल घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना मागील १५ ते २० वर्षांपूर्वीचे लाभार्थी यांच्याकडून मंजुरी पत्र मागण्याची अट रद्द करण्यात यावी अशी मागणी संग्राम कैलास निकम पाटील यांनी केली आहे ,

## सावळदबारा ग्रा. पं अंतर्गत शौचालय व दलित वस्ती च्या कामात लाखो रुपयांचा झाला भ्रष्टाचार; वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सुध्दा केली चिरी मिरी

### चौकशी अहवाल छ.संभाजीनगर जिल्हा परिषद कार्यालयात धुळखात पडून मुख्यकार्यकारी अधिकारी यांचं होत आहे दुर्लक्ष

**आत्ताच एक्सप्रेस**
**सोयगाव प्रतिनिधी/** मुख्यकार्यकारी अधिकारी अंकित साहेब उघडा डोळे बघा नीट सावळदबारा ग्रा. पं. अंतर्गत झालेल्या दलित वस्ती व इतर कामात भाजपा. चे भ्रष्टाचारी,माजी सरपंच,आणि ग्रामविकास अधिकारी यांनी संगन मत करून माजवला भ्रष्टाचाराचा तांडव यांच्या वरती कधी होणार कारवाई थेट. कुठं तरी पाणी मुरलं कीं काय त्याच मुळे कारवाई होत नाही की काय ? कारवाई होत नसल्यामुळे चिरी मिरी चा संशय व चर्चान्ना उधाण

सोयगाव तालुक्याला भ्रष्टाचारी अधिकारी व पदाधिकारी यांच्या मुळे लागलय भ्रष्टाचाराचे ग्रहण सोयगाव तालुक्यातील सावळदबारा ग्रामपंचायत मध्ये २०२०-२१--२२ या कालावधी मध्ये माजी सरपंच आणि ग्रामविकास अधिकारी तसेच काही झिरो सरपंच व लबाड दलाल गुत्तेदार यांनी मिली भगत करून ग्रामपंचायत अंतर्गत झालेल्या चौदा वित्त आयोग.पंधरा वित्त आयोग तसेच दलित वस्ती अंतर्गत झालेल्या कामांमध्ये लाखो रुपयांचा घोटाळा भ्रष्टाचार करून गावाच्या विकासाच्या पैशाला लावला चुना माजी सरपंच तथा गुत्तेदार हे भारतीय जनता पार्टी पक्षाचे कार्यकर्ते असल्यामुळे भाजपाच्या पदाधिकाऱ्यांचा दबाव तंत्र निर्माण करून ही चौकशी दाबण्याचा प्रयत्न सुरू झालेला आहे तसेच काही चिरी मिरी देऊन ही हा प्रकार दाबण्याचा प्रयत्न हे भ्रष्टाचारी चोर प्रयत्न करीत आहे सध्याला घोटाळेबाज भ्रष्टाचारी यांना भाजपा पक्षाचा मोठा फायदा लाभ होत आहे कदाचित त्याच मुळे हे आफात खोर भ्रष्टाचारी घोटाळेबाज यांचे घोटाळे दाबन्यात यश येताना दिसून येत आहे या घोटाळे बाज यांच्या साठी कायदा नाही का ? यांना सध्याला कुणाचाच धाक उरलेला दिसून येत नाही त्याच मुळे हुकूमशाही पद्धतीने हे घोटाळे बाज लाखो रुपयांचे भ्रष्टाचार करीत आहे सावळदबारा येथील अनुसूचित जाती चे दलित बांधव यांनी सोयगाव पंचायत समिती कार्यालयामध्ये दोन वर्षांपूर्वी दलित वस्ती सिमेंट रोड च्या कामामध्ये पाच लक्ष रुपयाच्या कामात घोटाळा भ्रष्टाचार झाल्याची तक्रार दाखल करण्यात आली होती परंतु माजी सरपंच,व ग्रामविकास अधिकारी तथा झिरो सरपंच, व गुत्तेदार यांनी चिरी मिरी देऊन हि तक्रार गायब करून टाकण्यात आली या तक्रारची कोणतीही चौकशी कारवाई झालेली नाही ती तक्रार कचरा कुंडी मधे बाहेर फेकून देण्यात आल्याचे तक्रारदार यांनी सांगितले त्या नंतर महाराष्ट्र एकलव्य आदिवासी विकास परिषद चे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष जब्बार तडवी यांनी दिनांक २४ / १२ / २०२४ रोजी भ्रष्टाचार झाल्याची तक्रार सोयगाव पंचायत समिती कार्यालय येथे दाखल केली असता

गटविकास अधिकारी दादाराव अहिरे यांनी चौकशी चे आदेश पत्र जारी केले असता दिनांक २९ / १ / २०२५ रोजी विस्तार अधिकारी ए. एन. दौड यांनी घटना स्थळी येऊन पंचनामा केला असता




या ठिकाणी. जिल्हा परिषद शाळेतील शौचालय, ग्रामपंचायत शौचालय. या कामात भ्रष्टाचार झाल्याचे निष्पन्न झालेले आढळून आले अपूर्ण काम करून बिल पैसा मात्र पूर्ण काढण्यात आला तसेच जी.प. शाळेतील पेवर ब्लॉक मधे तसेच घोडेस्वार बाबा दर्गाहच्या कामात या ठिकाणी घोटाळे करण्यात आलेले आहे. तसेच दलित वस्ती मधे सिमेंट रोड चे काम हे कृती आराखडा प्रमाणे काम न करता खाटीक गल्ली दलित वस्ती मधे हा निधी खर्च न करता गावठाण मधे काम न करता मालकीच्या शेतात गट क्रमांक सर्वे नंबर च्या जनरल वस्ती मधे दिशाभूल करून हा निधी वळविण्यात आला आणि नियमांचे उल्लंघन करून काम करण्यात आलेले आहे असा अहवाल प्राप्त झालेला आहे त्याच अनुषंगाने कारवाई साठी हा अहवाल जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर कार्यालयात पाठविण्यात आलेला असल्याचे पंचायत समिती गटविकास अधिकारी दादाराव अहिरे व विस्तार अधिकारी दौड यांनी सांगितले ग्रामपंचायत अंतर्गत झालेल्या अनेक कामान मधे लाखो रुपयांचा घोटाळा भ्रष्टाचार आढळून आलेला आहे माजी सरपंच यांनी पदाचा गैर वापर करून दादागिरी मनमानी हुकूमशाही पद्धतीने हा प्रकार केलेला आहे मात्र तरीही अद्याप कोणतीही कारवाई या भ्रष्टाचारी दोशीन वरती कारवाई झालेली नाही दोन ते अडीच महिन्यां पासून छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषद कार्यालय येथे हा चौकशी अहवाल धूळ खात पडून आहे नेमका हा चौकशी अहवाल या कार्यालयात धुळखात पडून आहे.का ?.कीं हा अहवाल तक्रार अर्जा प्रमाणे कचराकुंडीत फेकला गेला अशी शंका आता निर्माण होत असून अशी चर्चा सद्याला सोयगाव तालुक्यात व सावळदबारा परिसरात सुरु आहे

छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित हे या अहवाला नुसार या भ्रष्टाचारी माजी सरपंच. ग्रामविकास अधिकारी, तथा गुत्तेदार यांच्या वरती कधी कारवाई करणार तसेच कोणती कारवाई करणार या कडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.



# संक्षिप्त

## राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांचा जालना जिल्हा दौरा

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ महाराष्ट्र राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांचा जालना जिल्हा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे असणार आहे. श्री. सावकारे यांचे शुक्रवार, दि. २३ मे, २०२५ रोजी सकाळी जालना रेल्वेस्थानक येथे आगमन होणार असून, शासकीय विश्रामगृहाकडे रवाना होतील. सकाळी ५.४५ वाजता शासकीय विश्रामगृह येथे आगमन व राखीव. सकाळी १०.३० वाजता शासकीय विश्रामगृह येथून भारतीय जनता पक्ष कार्यालयाकडे प्रयाण करतील. सकाळी ११.०० वाजता भारतीय जनता पक्ष कार्यालय येथे बैठकीस उपस्थित राहतील. तसेच दुपारी २.३० वाजता शासकीय वाहनाने जालना येथून भुसावळ, जि. जळगावकडे प्रयाण करतील.

## महाराष्ट्र राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री मा.ना.श्री. संजयजी सावकारे यांची आज भाजपा जिल्हा कार्यालयात संवाद बैठक

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ महाराष्ट्र राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री मा.ना.श्री. संजयजी सावकारे हे दिनांक २३ मे २०२५ रोजी जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्याच्या निमित्ताने ते भारतीय जनता पक्षाच्या जालना जिल्हा कार्यालयात भेट देणार असून, सकाळी १०.०० वाजता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नेत्यांसोबत एक संवाद बैठक घेणार आहेत. या बैठकीला माजी केंद्रीय मंत्री तथा भाजपा नेते श्री.रावसाहेब पाटील दानवे, माजी मंत्री आ.बबनराव लोणीकर, जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे, आ.संतोष पाटील दानवे यांची उपस्थिती राहणार आहे. या बैठकीत पक्षाची संघटनात्मक घडामोडी, जिल्ह्यातील वस्त्रोद्योग विकासाचे प्रश्न, स्थानिक समस्या व जनतेच्या अपेक्षा याबाबत सविस्तर चर्चा होणार आहे. तसेच, सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी यावेळी उपस्थित राहून आपल्या सूचना, मतप्रदर्शन आणि विचार मांडावेत असे आवाहन भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष श्री.भास्कर आबा दानवे यांनी केले आहे.

## सुलीभंजन परिसरात तीन जनावरे दगावली

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद प्रतिनिधी** / खुलताबाद शहरापासून जवळच असलेल्या सुलीभंजन परिसरात बुधवारी (दि. २१) दुपारच्या दरम्यान तीन जनावरे दगावल्याची घटना घडली,सदरील या घटनाची ग्रामपंचायत आणि गंभीरतानी दखल घेऊन कचऱ्याचे विल्हेवाट लावण्याची मागणी पशुपालक विशाल घुसळे यांनी केला असून,





ग्रामपंचायत प्रशासन कचरयाबाबत सतर्क नसुन,कुठेही टाकलेला कचरा जनावरे खात असल्यानेच सदरील जनावरे दगावली आहेत या बाबत तहसील कार्यालय,पशुधन विकास विभाग, ग्रामपंचायतीला आपण निवेदन देणार असल्याचे सांगितले, यामुळे आपले जे नुकसान झाले त्याची भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.

# जिल्ह्याला यलो अलर्ट; सोसाट्याचा वारा, पावसाची शक्यता नागरिकांना दक्षता घेण्याचे प्रशासनाचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, कुलाबा, मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार जालना जिल्ह्यात दि. २२ मे, २०२५ रोजी यलो (धशश्रश्रे) अलर्ट जारी केला असुन, जिल्ह्यात तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह वादळ, सोसाट्याचा वारा (ताशी ४०-५० कि.मी.प्र.ता. वेगाने) हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता वर्तवली आहे. तसेच दि. २३ मे, २०२५ रोजी ढगांच्या गडगडाटासह हलका पाउस पडण्याची शक्यता वर्तविली आहे. दि. २४ व २५ मे, २०२५ या कालावधीत विजेच्या कडकडाटासह हलका व मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता वर्तविली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनातर्फे जिल्ह्यातील नागरीकांना खालीलप्रमाणे दक्षता घेणेबाबत आवाहन करण्यात येत आहे.

मेघगर्जनेच्या वेळी, वीजा चमकत असताना किंवा वादळीवारे वाहत असतांना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहू नये. वीजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा, धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये. गडगडाटीच्या वादळादरम्यान व वीजा चमकतांना कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. वीजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा, ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल/सायकल यांचेपासून दूर रहावे,मोकळे मैदान, झाडाखाली, टॉवर्स, ध्वजांचे खांब, विद्युत/ दिव्यांचे खांब, धातुचे कुंपण, विद्युतवाहिनी अथवा ट्रॉन्सफोर्मजवळ थांबू नये.

सर्व प्रकारच्या अर्थातरी लटकणाऱ्या / लोंबणाऱ्या तारांपासून दूर रहावे. वीजा चमकत असताना मोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्यांच्यामध्ये झाकावे, जमीनीशी कमीतकमी संपर्क असावा. अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकरी बांधवांनी वेळीच नियोजन करावे. शेतकऱ्यांनी शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समितीमध्ये शेतमाल विक्रीसाठी आणला असेल किंवा त्याप्रमाणे नियोजन केले असेल, तर सदर मालाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी,जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे.

सर्व नागरीकांनी वादळी वारे, वीज पासून स्वतः सह जनावरांचे संरक्षण होईल याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी, आपत्कालीन परिस्थितीत जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना ०२४८२-२२३१३२ वर तसेच नजीकचे तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन यांचेशी संपर्क साधाण्याचे आवाहजन निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण गणेश महाडिक यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## सैन्य दलाच्या सन्मानार्थ खुलताबादेत शिव सेना (शिंदे गट) ची तिरंगा रॅली

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद प्रतिनिधी**



/ खुलताबाद भारतीय सैन्य दलाने नुकतीच अतिरेक्यांविरुद्ध केलेल्या धडाकेबाज कारवाईच्या सन्मानार्थ खुलताबादेत गुरुवारी (ता.२२) सकाळी १० वाजता शिवसेना (शिंदे गट) तर्फे शहरात तिरंगा रॅली काढली. भारत माता की जयच्या घोषणा देत सहभागींनी भारतीय सैन्य दलाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.भद्रा मारुती मंदिरा पासून या रॅलीला सुरुवात झाली.

यावेळी तालुका प्रमुख विशाल खोसरे,निखिल चव्हाण,उप तालुका प्रमुख ज्ञानेश्वर दांडेकर, मनोहर वाकळे,श्रीकांत भालेराव,शहराध्यक्ष नरेंद्रजी साळुंखे,माजी सभापती किशोर कुकलारे, युवा सेना तालुकाप्रमुख युवराज नलावडे,बाजार सावंगी विभाग प्रमुख अनिल जाधव,दादासाहेब निकम,हर्षल हिवर्डे , अतुल चव्हाण,दिनेश चव्हाण,सोमीनाथ ठेंगडे,संजय चौधरी, सिताराम पवार,संतोष चंद्रटीके,ज्ञानेश्वर भगत,बंडू फुलारे , संतोष हारदे, बबनराव चंद्रटिके,धनंजय भागवत,दिनेश आधाने, सचिन भोजने,रामदास चंद्रटिके,संजय भागवत,ज्ञानेश्वर खोसरे, धीरज निकम,वसंतराव डोंगरे,प्रकाश पाटील मिसाळ,बाबासाहेब चंद्रटिके,शंकर रोडगे,तुषार खोसरे,झुंबर डुमाले आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## साने गुरुजी सोसायटीच्या संचालकपदी गणेश बोर्डे बिनविरोध

**आत्ताच एक्सप्रेस**

**वैजापूर/ प्रतिनिधी** /



वैजापूर तालुक्यातील सर्वात मोठी शिक्षक सोसायटी म्हणून नावा रुपाला आलेली सानेगुरुजी जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पत संस्थेची निवडणूक नुकतीच पार पडली.या निवडणुकीत शिक्षक गणेश शेकुजी बोर्डे यांची संचालक म्हणून बिनविरोध झाली. या निवडीबद्दल शिक्षक शाम राजपूत , आबासाहेब कसबे, संतोष आहेर , संजय पठारे, दत्तात्रय गायकवाड, आबासाहेब मगरे ,शेलार सर, गोमलाडू सर, यांनी गणेश बोर्डे यांचे अभिनंदन केले.

## नोटरी रिनिवल त्वरीत करण्यासाठी केंद्रीय मंत्रीशी चर्चा करणार - अँड. सिकंदर अली

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/महाराष्ट्र ॲन्ड गोवा नोटरी असोसिएशनचे अध्यक्ष अँड. सिकंदर अली व जिल्हा कार्याध्यक्ष अँड. महेश धन्नावत महाराष्ट्र व जालना जिल्ह्यातील नोटरी यांचे रिनिवल अनेक दिवसांपासुन प्रलंबीत आहे. त्यासंदर्भात थेट केंद्रीय कायदा मंत्री व सचिव यांच्याशी चर्चा करून नोटरी रिनिवल त्वरीत व्हावे याबाबत पाठपुरवठा करणार आहे. तरी ज्या नोटरींचे रिनिवल अद्यापी झालेले नाही, त्या लोकांनी अँड. सिकंदर अली यांच्याशी जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष किंवा अँड. धन्नावत यांच्याशी संपर्क करावे, असे आवाहन अँड. धन्नावत यांनी केले आहे. नोटरी हे लोकांना सेवा देतात व नोटरी सुविधा सतत देतांना जर त्यात खंड फक्त रिनिवल मुळे पडले तर लोकांना त्याचा त्रास सहन करावा लागत असल्याने नोटरी रिनिवल त्वरीत व्हावे यासाठी महाराष्ट्र न्ड गोवा नोटरी असोसिएशन प्रयत्नशील असल्याची माहिती अँड. सिकंदर अली यांनी दिली अहे.

## शहरातील नवीन व जुना जालना झोन पदधतीने एक तास प्रमाणे पाणी पुरवठा

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/जालना शहरातील सर्व नागरिकांना सुचित करण्यात येते की, सध्या पावसाळयाचे दिवस असल्यामुळे वारा-वादळामुळे विजपुरवठा खंडीत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शहरातील नवीन जालना व जुना जालना झोन पदधतीने एक तास प्रमाणे पाणी पुरवठा वितरण करण्यात येते. करिता पाणी वितरणाच्या वेळेस विजपुरवठा खंडीत झाल्यास तात्काळ एमएससीबी कार्यालयास संपर्क करुन विज पुरवठा चालु करुन घ्यावा. विज खंडीत झाल्याच्या वेळी पाणी पुरवठा बंद करण्याची विनंती करु नये. तरी सर्व नागरिकांनी पाणी पुरवठा विभाग महानगरपालिका जालनास सहकार्य करावे, असी विनंती महानगरपालिकेकडुन केली आहे.

# शेतकऱ्यांनी 'सस्ती अदालत' उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन

### - प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शुक्रवारी तालुकास्तरावर सस्ती अदालतीचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी**/ विभागीय आयुक्त यांच्या परिपत्रकानुसार मराठवाडा विभागातील आठ जिल्ह्यातील विभागीय आयुक्त कार्यालयास भेट देणाऱ्या नागरिकांच्या बहुतांश तक्रारी या शेतरस्ते, पाणंद रस्ते यावरील अतिक्रमाणाबाबत असल्याचे विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्या निदर्शनास आले होते. त्यानुसार विभागातील सर्व संबंधित नागरिकांना विभागीय आयुक्त यांच्याशी थेट संवाद साधण्यासाठी वेबिनारद्वारे संवाद साधला. त्यामध्ये मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी सहभाग व शेतरस्ते अतिक्रमण मुक्त करुन देण्याची मागणी केली. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील तरतुदी, मामलेदार कोर्ट अधिनियम १९०६ मधील तरतुदी आणि वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रक तसेच महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या रस्त्यांची प्रलंबित असलेली प्रकरणे निकाली काढणेबाबत निर्देशाच्या अनुषंगाने विभागात शेतरस्ते/पाणंद रस्ते अतिक्रमणाबाबत प्रभावी कार्यवाही करणे गरजेचे आहे. तसेच सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालय यांच्या निर्देशानुसार विभागस्तरावर व जिल्हास्तरावर वेळोवेळी प्रलंबित न्यायालयीन प्रकरणात तडजोड करून जलद गतीने प्रकरणाचा निपटारा करता सामान्य जनतेस न्याय मिळावा यासाठी वेळावेळी लोक अदालतीचे आयोजन करण्यात येते.

त्याच धर्तीवर सामान्य शेतकऱ्यांना अतिक्रमित शेतरस्ते/पाणंद रस्ते मोकळे करुन लवकर न्याय मिळावा व प्रकरणाचा तातडीने निपटारा व्हावा, यासाठी प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शुक्रवारी तालुकास्तरावर सस्ती अदालत आयोजित करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने शुक्रवार, दि. २३ मे, २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत या कालावधीत सस्ती अदालतीचे कामकाज सुरु राहणार आहे. जिल्ह्यातील सर्व तालूक्यात सस्ती अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. तरी गरजु शेतकऱ्यांनी आवश्यक त्या कागदपत्रांसह संबंधीत तालुक्याचे तहसिलदार यांच्याशी संपर्क साधून या उपक्रमाचा जास्तीत-जास्त सामान्य, गरजु शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# कर्जवाटप योजनेच्या नावाखाली लाभार्थ्यांना गंडा घालणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी**/ कै. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या कर्जवाटप योजनेच्या नावाखाली व्याज परताव्यासाठी लागणारे प्रमाणपत्र (एलओआय) लवकरात लवकर देण्याचे आमिष दाखवून लाभार्थ्यांची फसवणूक करणाऱ्या भामट्यांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे करणार असल्याची माहिती महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी गुरुवारी दिली.भारतीय जनता पार्टी प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये पाटील बोलत होते. यावेळी भाजपा प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, पोपटराव देशमुख आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या या कर्जवाटप योजनेच्या नावाखाली लाभार्थ्यांकडून पैसे उकळणाऱ्या केंद्र सरकारच्या सीएससी केंद्रांचे परवाने जिल्हाधिकाऱ्यांनी रद्द करावेत अशी मागणीही पाटील यांनी केली.

यावेळी पाटील म्हणाले की या पद्धतीने झालेल्या फसवणुकीचे काही प्रकार निदर्शनास आल्यानंतर आपण स्वत: कराड येथे तक्रार दाखल केली आहे.कै. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या कर्ज वाटप योजनेद्वारे गरीब, गरजू



मराठा समाजातील युवा वर्गाला उद्योग उभारण्यासाठी बँकांच्या माध्यमातून कर्जपुरवठा केला जातो. कर्जावर महामंडळाच्या माध्यमातून व्याज परतावा देण्यात येतो. महामंडळाच्या सर्व योजना ऑनलाइन आहेत. महामंडळाकडून कधीही या प्रमाणपत्रासाठी पैशांची मागणी होत नाही हे देखील पाटील यांनी स्पष्ट केले.

आत्तापर्यंत १ लाख ३८ हजार लाभार्थ्यांनी महामंडळाच्या या योजनेचा लाभ घेऊन स्वत:चा व्यवसाय सुरू केला आहे. ११ हजार कोटींचे कर्जवाटप झाले असून एक हजार कोटींपेक्षा अधिक व्याज परतावा महामंडळाकडून लाभार्थ्यांना देण्यात आला आहे. योजनेची व्याप्ती वाढली तशी लाभार्थ्यांची फसवणूक करणारी मंडळी सक्रीय झाली आहे. गरजूंची फसवणूक होण्याची शक्यता असल्याने सर्वांनी सावध रहावे अशी विनंती पाटील यांनी केली. फसवणुकीची घटना घडल्यास आपण होऊन अर्जदार अथवा लाभार्थ्यांनी ठकसेनांविरोधात तक्रार दाखल करावी असे आवाहन देखील पाटील यांनी केले.

# महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या संयुक्त शेतीधारक शेतकऱ्यांना वीज पुरवठ्यासाठी सौर ऊर्जा प्रकल्प उभारणार - महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**मुंबई** / महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या संयुक्त शेतीधारक शेतकऱ्यांना वीजपुरवठा होण्यासाठी कमी मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येतील, यासाठी महाजनको व संबंधित शासकीय उपक्रमांकडून प्रस्ताव मागवून कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.




मंत्रालयात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या विविध विषयांशी संबंधित बैठक झाली. यावेळी महसूल राज्यमंत्री योगेश कदम, विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार, महाजनकोचे अध्यक्ष बी. राधाकृष्णन, महसूल विभागाचे सहसचिव अजित देशमुख, शेती महामंडळ, ऊर्जा व महसूल विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

शेती महामंडळाच्या जमिनी करार पद्धतीने शेती शेतकऱ्यांना देण्यात आल्या असून त्या ठिकाणी महावितरणकडून वीज पुरवठा केल्यास जास्त खर्च येऊ शकतो असे निदर्शनात आले आहे. या शेतकऱ्यांना मुख्यमंत्री सौर कृषी योजनेतून वीज उपलब्ध करुन देण्यासाठी सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येतील. यासाठी ही योजना पूर्ण करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे मंत्री श्री.बावनकुळे यांनी सांगितले.

राज्य शेती महामंडळाच्या जमिनी संयुक्त शेतीसाठी विविध ठिकाणी देण्यात आल्या आहेत. यासह महामंडळाच्या जमिनीवर सौर ऊर्जा प्रकल्प आणि सोलार पार्क निर्मितीसाठी देखील जागा निश्चित केली जावी, अशा सूचना महसूल मंत्री श्री. बावनकुळे यांनी दिल्या.

## परदेशी शिष्यवृत्ती योजनेचे अर्ज करण्यास ६ जूनपर्यंत मुदतवाढ इच्छुक विद्यार्थ्यांनी अर्ज करावेत - मंत्री अतुल सावे

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी**/राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमाती (विजाभज), इतर मागास वर्ग (इमाव) आणि विशेष मागास प्रवर्ग (विमाप्र) मधील विद्यार्थ्यांसाठी परदेश शिक्षण शिष्यवृत्ती योजनेंतर्गत अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १७ मे २०२५ अशी होती. ही मुदत वाढवून ६ जून २०२५ पर्यंत करण्यात आली आहे. तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी परदेश शिक्षण शिष्यवृत्तीसाठी अर्ज करावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी केले आहे.



परदेशातील क्यूएस (QS) रँकिंग २०० मधील परदेशी संस्थांमध्ये २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदवीका तसेच पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या ७५ विद्यार्थ्यांना दरवर्षी शिष्यवृत्ती मंजूर केली जाते. ही शिष्यवृत्ती शाखानिहाय व अभ्यासक्रमनिहाय दिली जाते.

परदेशी शिष्यवृत्तीसाठी अर्जाचा नमुना, शासन निर्णय, शिष्यवृत्तीसाठी पात्रतेच्या अन्य महत्त्वाच्या अटी व शर्ती इत्यादी सविस्तर माहिती विभागाच्या www.maharashtra.gov.in किंवा https://obcbahujankalyan.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांनी अर्ज या संकेतस्थळावरुन डाउनलोड करून, परिपूर्ण अर्ज आवश्यक कागदपत्रांसह ६ जून २०२५ रोजी सायंकाळी ०६.१५ वाजेपर्यंत समक्ष किंवा पोस्टाने इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, आकार प्रिमायसेस, दुसरा मजला, एम. एच. बी. कॉलनी, म्हाडा कमर्शिअल कॉम्प्लेक्स समतानगर, येरवडा पुणे-४११००६ येथे दोन प्रतीत सादर करावा.

## जलशुद्धीकरण केंद्रातील बिघाडाची युद्धपातळीवर दुरुस्ती

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी**/ महानगरपालिकेच्या फारोळा जलशुद्धीकरण केंद्रातील विद्युत यंत्रणेत गुरुवारी बिघाड झाला. हा बिघाड महानगरपालिकेच्या अखत्यारित असूनही त्यांचे कर्मचारी यायला लागणारा वेळ आणि शहराच्या पाणीपुरवठ्याचे गांभीर्य लक्षात घेऊन महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी स्वंयस्फूर्तीने काम करत वीजपुरवठा पूर्ववत केला.फारोळा जलशुद्धीकरण केंद्रात महानगरपालिकेच्या विद्युत यंत्रणेतील क्युबिकलमध्ये दुपारी पावणेदोनच्या सुमारास मोठा आवाज होऊन ३३ केव्ही वाहिनीचा वीजपुरवठा बंद झाला. ही बाब महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी महावितरणच्या बिडकीन कार्यालयास कळवली. महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी पाहणी करून बिघाडाचा शोध घेतला, तेव्हा क्युबिकलला जाणाऱ्या केबलचा जॉइंट खराब झाल्याचे आढळले. उच्चदाब जोडणीमध्ये क्युबिकलची जबाबदारी ग्राहकाची असते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अँण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813